# राज्याचा संक्षिप्त आढावा

देशाच्या पश्चिम व मध्य भागात वसलेल्या महाराष्ट्राला अरबी समुद्राचा ७२० किमी लांबीचा विस्तीर्ण समुद्रकिनारा लाभला असून सह्याद्री व सातपुडा या पर्वतरांगांची नैसर्गिक तटबंदी लाभली आहे. राज्याच्या वायव्येस गुजरात, उत्तरेस मध्य प्रदेश, पूर्वेस छत्तीसगड, आग्नेयेस तेलंगणा, दक्षिणेस कर्नाटक व नैऋत्येस गोवा आहे. प्रशासकीय सोयीसाठी राज्याची विभागणी ३६ जिल्हे व ६ महसूल विभागांमध्ये करण्यात आली आहे.

राज्याचे हवामान उष्ण कटिबंधीय मोसमी आहे. मार्चपासून सुरु होणाऱ्या व अंगाची काहिली करणाऱ्या उन्हाळ्या पाठोपाठ जूनच्या सुरुवातीला पावसाळा येतो. पावसाळ्यातील हरित व आल्हाददायी वातावरण, ऑक्टोबरच्या असुखद वातावरणानंतर येणाऱ्या सौम्य हिवाळ्यात टिकून राहते.

जनगणना २०११ नुसार ११.२४ कोटी लोकसंख्या असलेले आणि ३.०८ लाख चौरस किमी भौगोलिक क्षेत्रफळ असलेले महाराष्ट्र राज्य लोकसंख्येनुसार देशात दुसऱ्या क्रमांकाचे तर क्षेत्रफळानुसार देशात तिसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. महाराष्ट्र राज्य रेल्वे, रस्ते, हवाई व जल मार्गाने जोडले गेले असून देशातील मोठ्या प्रमाणात शहरीकरण झालेल्या राज्यांपैकी एक आहे.

उत्तम पायाभूत सुविधा, मुबलक नैसर्गिक साधनसंपत्ती, प्रमुख भागांशी संपर्क, कुशल मनुष्यबळाची उपलब्धता आणि दर्जेदार शिक्षण यामुळे महाराष्ट्र हे नवीन उद्योग स्थापित करण्यासाठी आदर्श ठिकाण झाले आहे. पायाभूत सुविधा व स्मार्ट शहरे विकसित करण्यावर राज्याने भर दिला आहे.

राज्याची राजधानी मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. मुंबई केवळ अग्रेसर कार्पोरेट संस्थांच्या व कंपन्यांच्या मुख्य कार्यालयांचे माहेरघर नसून आशिया खंडातील सर्वात जुना शेअर बाजार, मुंबई शेअर बाजार, हा देखील याच शहरात दिमाखात उभा आहे.

महाराष्ट्र ही फक्त एक भौगोलिक संज्ञा नसून लोकांच्या एकत्रित प्रयत्नांनी उभे राहिलेले राज्य आहे. राज्यात विविध चालीरीती व परंपरा असलेले लोक गुण्यागोविंदाने राहतात. आपल्या समृद्ध संगीत व नृत्य परंपरेसाठी राज्य देशात प्रसिद्ध आहे. पोवाडा, भारुड, गोंधळ आणि लावणीच्या माध्यमातून लोककलेमध्ये केलेल्या भरीव योगदानासाठी राज्य ओळखले जाते. महाराष्ट्राला उच्च दर्जाची नाट्य परंपरा आहे. राज्य विविध पाककृतींसाठी देखील प्रसिद्ध आहे. सर्व प्रमुख धार्मिक सण राज्यात शांततेने व सौहार्दतेने साजरे केले जातात. देशाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रगतीमध्ये राज्याचा बहुमोल वाटा आहे.

अजंठा, वेरूळ व घारापुरी लेणी, १९ व्या शतकातील नव-गॉथिक शैलीतील सार्वजनिक इमारती व २० व्या शतकातील आर्ट डेको इमारती, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ही जागतिक वारसा स्थळे राज्यात आहेत. बुलडाणा जिल्ह्यातील लोणार सरोवर आणि नाशिक जिल्ह्यातील नांदूर मधमेश्वर या नैसर्गिक पाणथळ क्षेत्रांना रामसर स्थळांचा दर्जा प्राप्त झाला आहे. ही जागतिक वारसा स्थळे, वास्तुकलेचा उत्तम नमुना असलेले गेट वे ऑफ इंडिया आणि चैत्य व विहार, वन्यजीव अभयारण्ये, पक्षी अभयारण्ये, समुद्र किनारे, गडकिल्ले कायमच जगभरातील पर्यटकांना आकर्षित करतात.

राज्याने क्रीडा, कला, साहित्य व सामाजिक सेवा यांमध्ये आपला स्वतःचा ठसा उमटवला आहे. मनोरंजन क्षेत्रात जागतिक स्तरावर नावाजलेले बॉलीवूड हे देखील राज्याचा हिस्सा आहे.

काळाच्या प्रत्येक टप्प्यावर प्रगतिशील राहून आपले पुरोगामित्व सिद्ध करणाऱ्या महाराष्ट्र राज्याने शाश्वत विकासाच्या दिशेने आपली वाटचाल सुरू ठेवली आहे.

* * * * *